स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.ssceboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/भांडार/उत्तरपत्रिका वितरण/जुलै-ऑगस्ट २०२३/ 881 दिनांक:- 0 6 JUL 2023

**परीक्षा प्राधान्य/महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य / केंद्रसंचालक,
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२३
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२३ या परीक्षेच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स वापरण्याबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, जुलै-ऑगस्ट २०२३ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी लागणा-या उत्तरपत्रिका, पुरवण्या, नकाशा, होलोक्राफ्ट स्टीकर्स इत्यादी साहित्य हस्तपोहोच पाठविण्यात आले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

**** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी ) ****

१. **२८ पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका (ब्राऊन शाई)**

सदरच्या २८ पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका सर्व माध्यमांच्या सर्व विषयांच्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या आहेत. सदर उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना वाटप करण्या अगोदर आतील पाने कमी जास्त, मळकट, अपूरी सुटलेली फाटलेली व क्रमवार नसलेली पानांची उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना दिली जाणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सर्व माध्यमांची विद्यार्थी संख्या विचारात घेऊन उत्तरपत्रिकांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

२. **४ पानी बारकोड असलेल्या पुरवणी (ब्राऊन शाई)**

सर्व माध्यमाच्या सर्व विषयांच्या विद्यार्थ्यांना ४ पानी पुरवण्यांचा आवश्यकतेनुसार पुरवठा करण्यात यावा.

३. **४ पानी नकाशा बारकोड असलेल्या पुरवणी**

सदरची नकाशा पुरवणी भूगोल विषयासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाची आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांस एक या प्रमाणे सदर पुरवणीचा पुरवठा करण्यात आलेला आहे. परीक्षेसाठी सुधारित स्वरुपाच्या नकाशाची छपाई करुन पुरवठा करण्यात येत असून त्याच नकाशा पुरवणीचा वापर करावा, शिल्लक नकाशा पुरवणीचा वापर करण्यात येवू नये.

४. **काळे होलोक्राफ्ट स्टिकर्स (HOLOCAFT STICKERS)**

उत्तरपत्रिका, पुरवण्या, नकाशे इत्यादीवर होलोक्राफ्ट स्टिकर्स चिकटवताना ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, केंद्र क्रमांक इत्यादी माहिती आहे अशा ठिकाणी न चुकता होलोक्राफ्ट स्टिकर्स चिकटवण्यात यावा, जेणे करुन गोपनीयतेचा भंग होणार नाही. तशा सूचना पर्यवेक्षकांनाही देण्यात याव्यात.

(कृ.मा.प.)

वरील साहित्य ताब्यात मिळताच साहित्याची त्वरीत मोजदाद करुन घ्यावी. साहित्याची मोजदाद करुन न घेतल्याने नकाशा, पुरवण्या उत्तरपत्रिका इत्यादी साहित्य पेपरच्या दिवशी फोनवरुन मागणी केली जाते व त्यामुळे कार्यालयाची अडचण होते. तरी याबाबत आपण स्वतःसर्व साहित्य ताब्यात मिळताच त्वरीत मोजून घ्यावे. कमी पडत असल्यास साहित्य तात्काळ आपल्या प्रतिनिधी मार्फत मागवून घ्यावे. उत्तरपत्रिकेवर पृष्ठ क्रमांक चुकले असतील किंवा खराब, फाटलेल्या असतील तर त्या वेगळ्या ठेवाव्यात त्याचा वापर करु नये.

**(महत्वाची सूचना)**

२८ पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका, नकाशे, पुरवण्या इत्यादी मोठया प्रमाणात छपाई करुन घ्यावी लागते. त्यामुळे उत्तरपत्रिकांमध्ये पानांची संख्या कमी अगर जास्त असणे, छपाई अस्पष्ट, शिलाई व्यवस्थित नसलेल्या, मळकट अशा उत्तरपत्रिकांचा पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा प्रकारच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या व नकाशा पुरवणी विद्यार्थ्यांना देण्यापूर्वी उत्तरपत्रिकांची तपासणी करून चांगल्या स्थितीत असलेल्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख व नकाशा पुरवण्यांचा विद्यार्थ्यांना पुरवठा करण्यात यावा. जेणेकरुन विद्यार्थ्यांची अडचण होणार नाही. तसेच शिक्के मारण्यात आलेल्या व लिहिलेल्या उत्तरपत्रिका, पुरवण्या कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्याला दिली जाणार नाही, याबाबत दक्षता घेणेबाबत सबंधित स्टेशनरी सुपरवायझर, ब्लॉक सुपरवायझर यांना सूचना देण्यात याव्यात.

वरील प्रमाणे २८ पानी उत्तरपत्रिका, पुरवण्या व होलोक्राफ्ट स्टिकर्स पाठविण्यात येत असून ते सुयोग्य रित्या वितरित करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील, याची नोंद घ्यावी.

सदर सूचनांप्रमाणेच साहित्य (उत्तरपत्रिका, पुरवण्या, नकाशे इ.) वापरावयाचे आहे.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**टिप : परीक्षा संपताच शिल्लक असणारे सर्व साहित्य (उदा. उत्तरपत्रिका, पुरवणी, नकाशे व लॉगटेबल्स इ.) व्यवस्थितरित्या गठ्ठे बांधून आपल्या संबंधित परिरक्षक कार्यालयात यादीसह जमा करावे व जमा केलेल्या शिल्लक साहित्याचा अहवाल मंडळास ०८ (आठ) दिवसात न चुकता पाठवावे.**

प्रत माहितीस्तव : सर्व परिरक्षक - सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हे